दिनांक २५ मे २०२२

माननीय सभासद

गुरुराज नंबर २ को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लिमिटेड;
गंधर्व नगरी

आपल्या सोसायटीच्या पुनर्विकास प्रक्रियेसाठी सोसायटीने मेटामॉर्फोसिस, पुणे यांची नियुक्ती प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून केली आहे. पुनर्विकासाची पुढील कार्यवाही आणि प्रक्रिया सुरू करताना व्यवस्थापकीय समिती सदस्यांप्रमाणेच इतर सभासदांना देखील काही शंका, प्रश्न असतील, किंवा काही विशेष मुद्द्यांवर सखोल माहिती करून घेण्याची आवश्यकता वाटणेही स्वाभाविकच आहे. सोसायटी पुनर्विकासाबाबत सर्व शंकांचे व प्रश्नांचे निरसन आणि आपण राबवत असणाऱ्या पुनर्विकास प्रक्रियेबद्दल अधिक माहिती योग्य त्या अधिकृत व्यक्तीनेच दिलेली कधीही चांगली हे जाणून घेऊन, व्यवस्थापकीय समितीने मेटामॉर्फोसिस, पुणे "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" यांच्यासोबत एक माहिती सत्र रविवार, दिनांक ५ जून २०२२ रोजी सकाळी १० वाजता स्वस्तिक सभागृह, कमिन्स इंडिया गेट जवळ, डहाणूकर कॉलनी येथे आयोजित केले आहे.

ह्या माहिती सत्रात प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार - मेटामॉर्फोसिस , पुढील प्रक्रियेची माहिती देतील व त्यांना लागणाऱ्या सहयोगासंबंधी मार्गदर्शन करतील. तसेच कोणत्याही सभासदास काही शंका, प्रश्न असल्यास किंवा कोणत्याही गोष्टीची अधिक माहिती करून घ्यावयाची असल्यास त्यावर योग्य ते समाधान करतील.

तरी सर्व सभासदांनी या माहिती सत्रात आवर्जून सक्रिय सहभाग घेऊन पुनर्विकासाच्या प्रक्रियेची माहिती करून घ्यावी आणि आपल्या सर्व शंकांचे निरसन करून घ्यावे, ही विनंती.

विशेष सूचना: सभासदांच्या काही शंका, सूचना किंवा काही प्रश्न असतील तर ते दिनांक ३१ मे २०२२ संध्याकाळी ७ वाजेपर्यंत सोसायटी ई-मेल gururajno2.gandharva@gmail.com वर किंवा लेखी स्वरूपात सोसायटी ऑफिसमध्ये किंवा ऑफिसच्या पत्र पेटीत सादर करावेत ही विनंती. प्राप्त झालेले सर्व लेखी प्रश्न प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना त्वरित पाठविण्यात येतील व त्यांना या प्रश्नांचा अभ्यास करून माहिती सत्रात त्यांचा सविस्तर खुलासा करण्याची विनंती करण्यात येईल.

व्यवस्थापकीय समिती,
गुरुराज नंबर २ को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (गंधर्व नगरी)

| विक्रमसिंह देसाई | समीर पुणेकर | वैभव देशपांडे |
| --- | --- | --- |
| अध्यक्ष | सचिव | खजिनदार |

सर्व सभसदांना नम्र विनंती...

लेखी आणि आधी कळवलेले प्रश्न प्राधान्याने विचारात घेतले जातील. वेळे ची मर्यादा लक्षात घेता ऐनवेळेच्या प्रश्नांचे निरसन करता येणे शक्य होईलच असे नाही. याची कृपया याची नोंद घ्यवी.